जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मंगळवार दि.४ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# भालगाव ग्रामस्थांनी भगवानगडाला दिली ७४ लाख रुपयांची देणगी

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर (वृत्तसंस्था)**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे.देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री. क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे भालगांव (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ७४ लाख रुपये झाली.नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



# धर्मा डाँकी सँच्यूअरी संस्थे तर्फे देगलूरचा गाढव सर्वात देखणा ठरला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

धर्मा डाँकी सँच्यूअरी सगरोळीच्या संस्थे तर्फे तिन दिवसाचे कृषी विज्ञान केंद्र आयोजित कृषी तंत्रज्ञान महोत्सव प्रदर्शन साजरा करण्यात आला. या प्रदर्शनामध्ये शेतकरी व पशुपालकांनी गाय, म्हैस, बैल, शेळ्या, अश्व, कोंबड्या व ४२ गाढव विविध जातीचे श्वान प्रदर्शनात आणली होती या प्रदर्शनी ४२ गाढवा पैकी मुख्य आकर्षण हे देखना व सुदृढ स्पर्ध्यामध्ये देगलूर तालुक्यातील मौजे आलूर येथील बालाजी मुत्तेपवार यांच्या गाढवाने प्रदर्शन स्पर्धेत आकर्षक देखावा व सुंदर असल्याने प्रथम तर सगरोळीचे दत्ता इबितवार व संजय इबितवार यांच्या गाढवाने द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देखावा व सुदृढ गाढवाने मान मिळवला आहे.

धर्मा डाँकी सँच्यूअरी या संस्थेने प्रथमच या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत



गाढव पालकांनी प्रतिसाद दिला यावेळी ४२ गाढव स्पर्धेत सहभागी झाले होते.
या स्पर्धेत पशु वैद्यकीय डॉ. निहाल मुल्ला, डॉ. अजय कचरे, डॉ. व्यंकट जाधव, डॉ. संजय अलमवार, डॉ. स्नेहा स्वामी तसेच डॉ. अक्षय मुसळे यांनी गाढवाचे परीक्षण करून निकाल जाहीर केला. विजेत्यांना धर्मा डाँकी सँच्यूअरी संस्थेचे संचालक रोहित देशमुख यांच्या हस्ते रोख पारितोषक देऊन गौरविण्यात आले आहे कमी कालावधीमध्ये प्रथमच या स्पर्धेचे आयोजन केल्यानंतर ही गाढव पालकांनी चांगला प्रतिसाद दिला. पुढील वर्षी हि स्पर्धा मोठ्या प्रमाणात करण्यात येऊन गाढव पालकांना प्रोत्साहन देण्यात येईल असे रोहित देशमुख यांनी सांगितले. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीण घुले यांनी भेट देऊन पाहणी करून गाढव पालकांचे कौतुक केले. धर्मा डाँकी सँच्यूअरी ही संस्था गत वीस वर्षापासून गाढवाचे उपचार व पशुपालकांमध्ये जनजागृती करण्याचे कार्यक्रम करीत आहे कष्टाळू व दुर्लक्षित असलेल्या गाढवाची निगा उतम प्रकारे ठेवण्यास प्रोत्साहन करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले आहे.

# कोणत्याही क्षेत्रामध्ये जिद्द व चिकाटी ठेवावे तरच यश संपादन करू शकतो-नंदकिशोर पायघन

## आदित्य अर्बन को ऑफ क्रेडिट सो.लि.भोकरदन शाखेची यशस्वी वाटचाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

भोकरदन येथील आदित्य अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटी भोकरदन येथील आदित्य अर्बन दुसरा वर्धापन दिन मोठ्या थाटामाटात संपन्न करण्यात आला यावेळी आदित्य अर्बन शाखेचे अध्यक्षांनी बोलताना सांगितलं मेहनत घेतल्याशिवाय यश संपादन होऊ शकत नाही सुरुवातीला आम्हाला अत्यंत अडचणी आल्या पण आम्ही त्या अडचणीचा सामना केला थेंब थेंब तळे साचे या अनुषंगाने आम्ही आणि आमची टीमने प्रयत्न चालू ठेवले शाखा वालसावंगी वालसा वडाळा लवकरच आपल्या सेवेत असे अध्यक्ष सविता नंदकिशोर पायघन यांनी बोलताना सांगितले यावेळी स्तरावरून भोकरदन येथे दुसरा वर्धापन दिन मोठ्या थाटामाटात संपन्न झाला यावेळी स्तरावरून सभासद मंडळी खातेदार



अंकुश दळवी, संतोष सोनुने, अनिल दुतोंडे, संजय पिसे, डॉक्टर विपिन कुमार, काबरा साहेब, खुशाल बोरसे, नारायण सर, वसंतराव फुसे, प्रकाश पुसे गजानन दळवी, सोनवणे पाटील, विजू पिसे, विष्णुपंत, शकील शेठ अजहर भाई ,मुंशी सेट, शालिकराम सपकाळ, गजानन सपकाळ, दीपक शिंदे, अनिल गिरणारे, डॉराजपूत साहेब, मोतीराम काटोले, सुदाम पायघन, काशीराम पायघन, माणिक दळवी, पंढरीनाथ शेरकर, महेंद्र पुसे, दत्ता दळवी किशोर इंगळे यांनी नंदकिशोर पायघन यांचे अभिनंदन केले व आदित्य अर्बन शाखेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# एसटी महामंडळाच्या कारभाराचा बट्ट्याबोळ प्रवाशांची कोंडी!

## विद्यार्थ्यांचे नुकसान: वेळेवर पोहोचण्याची शाश्वती नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

वाऱ्यावर सोडलेल्या गाड्या आणि खांद्यावर घेतलेल्या जबाबदाऱ्या या म्हणीचा प्रत्यय अहमदपूर आगारात सध्या पाहायला मिळत आहे. अहमदपूर आगारातून चालणाऱ्या बस फेऱ्या कमी झाल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, प्रवासी वर्गाचा तीव्र संताप व्यक्त होत आहे.

२०२१ पासून अहमदपूर–लातूर या मार्गावर दर १५ मिनिटांनी १० बसेस सोडल्या जात होत्या. यामुळे प्रवाशांना वेळेत प्रवास करता येत असे. मात्र, सध्या फक्त ८ बसेसच उपलब्ध असल्याने या फेऱ्यांची संख्या २४ वर आली आहे. अशाच प्रकारे अहमदपूर–शिरूर–मुखेड आणि अहमदपूर–अंबाजोगाई या मार्गांवरही बस फेऱ्या कमी केल्याने प्रवाशांची मोठी कोंडी झाली आहे.

**आगारप्रमुखांचा आर्थिक गोंधळ आणि मर्जी राखणारा कारभार**

वरिष्ठांचा विश्वास गाठण्यासाठी खालच्या स्तराला सोडून द्यायचे हा प्रकार अहमदपूर आगारप्रमुखांकडून सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. उत्पन्नाच्या नावाखाली नगदी रोख रक्कम वाढवण्यासाठी त्यांनी गर्दीच्या मार्गावरील फेऱ्या कमी केल्या आहेत. यातून एका बाजूला प्रवाशांचे हाल होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला आगारप्रमुख हे वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी राखण्यासाठी नियमबाह्य निर्णय घेत असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि जेष्ठ नागरिकांची अडचण**

गरज सरो आणि व्यवहार संपो या म्हणीप्रमाणे एसटी महामंडळाने काही योजना सुरू केल्या, जसे की अमृत महोत्सवी वर्ष जेष्ठ नागरिक योजना आणि महिला सन्मान योजना. मात्र, या सवलतींचा गैरफायदा घेत काही मार्गांवरील फेऱ्या बंद केल्या गेल्याने विद्यार्थी वर्गाची विशेष अडचण झाली आहे. थांबे सोडून पुढे–मागे प्रवासी उतरवले जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

**प्रवासी व सामाजिक संघटनांचा आक्रोश**

जसे वाजवावे तसे नाचावे लागते या उक्तीप्रमाणे प्रवाशांनी आंदोलन करण्याचा पवित्रा घेतल्यास यात आश्चर्य वाटायला नको. काही सामाजिक संघटनांनी आगारप्रमुखांवर ताशेरे ओढत, एसटी महामंडळाने प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन फेऱ्यांमध्ये सुधारणा करावी अशी मागणी करण्याच्या पवित्र्यात आहेत.

**काय आहे पुढील उपाययोजना?**

दिवा मातीचा असला तरी प्रकाश मोठा देतो या उक्तीनुसार प्रवाशांना दिलासा देण्यासाठी फेऱ्यांमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. तसेच, जेष्ठ नागरिक व महिलांना प्रवासासाठी विशेष सवलत देण्यात यावी, अशी अपेक्षा आहे. आगारप्रमुखांनी उत्पन्नाच्या मागे न धावता प्रवाशांच्या सोयीसाठी प्रभावी निर्णय घेतल्यास प्रवाशांचा विश्वास परत मिळवता येईल. अन्यथा सामाजिक संघटनांचे आंदोलन आणि जनतेचा विरोध महामंडळाला सहन करावा लागेल.

**प्रवाशांची कोंडी: बस फेऱ्या कमी,गैरसोय अधिक**

# दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांना साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पनवेल । प्रतिनिधी**



थोर क्रांतिकारक साहित्यिक स्वातंत्र्यसेनानी व समाजवादी विचारवंत साने गुरुजी यांची २४ डिसेंबर रोजी शतकोत्तर रोप्यमहोत्सव जयंती साजरी करण्यात आली त्यानिमित्त परेल मुंबई येथे रविवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती ( महाराष्ट्र राज्य),च्या वतीने विशेष उल्लेखनिय कार्याचा व सेवेचा गौरव म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमांमध्ये साने गुरुजी यांच्या भारतीय संस्कृती बाबतचा विचारांची उजळणी करण्यात आली तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

त्यामध्येच युवा नेतृत्व म्हणून दैनिक युवक आधारचे संपादक, कर्तुत्वान, अभ्यासू, जनसंपर्क व्यक्तिमत्व संतोष शिवदास आमले यांना साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार मुंबई विद्यापीठाचे *मा.कुलगुरु तथा माजी खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. आता पर्यंत संतोष आमले यांना दादासाहेब फाळके २०२५ अवॉर्ड तसेच ललकारी सन्मानाची राज्यस्तरीय पुरस्कार, पनवेल येथे भीम रत्न पुरस्कार,असे अनेक पुरस्कार त्यांच्या कामाची दखल घेऊन प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे संतोष आमले चे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आज गुरुजींचे विचार समयोजित आहेत खऱ्या भारतीय संस्कृतीच्या विकासासाठी सक्रिय होणे हीच गुरुजींना त्यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आदरांजली ठरेल असे संतोष आमले यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले

१० पेक्षा जास्त वर्षाचा उद्योगांचा अनुभव असलेल्या दैनिक युवक आधार चे संपादक संतोष आमले यांनी आपल्या वृत्तपत्र व उद्योगाच्या माध्यमातून मार्गदर्शन म्हणून एक उत्तम पिढी घडवण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. नेतृत्व आणि नवकल्पनांचा प्रवास खूप सहनशीलता मागतो आणि संतोष आमले यांनी आपल्या व्यवसाय आणि वृत्तपत्राचे कौशल्याने व्यवस्थापन केले ते सांगतात की त्यांचे कुटुंब हा त्यांच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे जो नेहमीच त्यांच्या पाठीशी खंबीर उभा असतो.

नैतिकता आणि प्रामाणिकता हे संतोष आमले संपादक दैनिक युवक आधार यांच्या यशाचे आधारस्तंभ आहेत.संतोष आमले यांना आपल्या यशाबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले चांगल्या परिणामांसाठी प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करा परिणामावर नाही.

# सुरेशअण्णा धस यांचे वाढदिवसानिमित्त भव्य दंतचिकित्सा व नेत्र तपासणी शिबिर संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

१ फेब्रुवारी २०२५ आमदार सुरेश आण्णा धस यांचे वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक सभागृह धानोरा येथे युवा नेते जयदत्त भाऊ धस यांचे उपस्थितीत शुभ हस्ते शिबिराचे उद्धाटन झाले,प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार मा.साहेबरावजी दरेकर नाना हेही उपस्थित होते.याप्रसंगी धानोरा व धानोरा परिसरातील जवळजवळ ५०० गरजू रुग्ण उपस्थित होते. अहिल्यानगर येथील नेत्रतज्ञ डॉ.प्रकाश रसाळ, डॉ.सागर शिंदे (हिरडी व दंतरोपण तज्ञ), डॉक्टर मयुरी शिंदे ( कॉस्मेटोलॉजिस्ट, केशर रोपन तज्ञ ) पुणे येथील दंतचिकित्सक डॉ.स्नेहल बोलभट/थोरवे यांनी मार्गदर्शन तसेच ५०० रुग्ण(दंत चिकित्सा व नेत्र तपासणी )व तीनशे शाळेतील मुलांची दंत चिकित्सा केली याप्रसंगी पं.स.सदस्य ज्येष्ठ नेते परमेश्वर काका शेळके,माजी सभापती अंकुशराव चव्हाण,माजी सरपंच राजाभाऊ शेळके, अशोक लगड, बीड जिल्हा जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णाताई गिऱ्हे मॅडम, पत्रकार सय्यद बबलू शिवसेना तालुकाप्रमुख कुमार शेळके, जनता विद्यालयाचे सचिव विशाल बांदल, सुनील तरटे सर, गिऱ्हे सर, कुमार टकले, जय चाणोदया,इंजि.रमेश जी ढोबळे,इंजि.आदी उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शिरीष भाऊ थोरवे, इंजि.शैलेश थोरवे, शिवाजी थोरवे,आजिनाथ शेळके, अहिल्यानगर येथील सर्व नेत्र चिकित्सा टीम,दंतचिकित्सक सर्व टीम यांनी कमालीचे कष्ट घेतले.सर्व रुग्णावर योग्य ते औषध उपचार मोफत करण्यात आले.

# दुष्काळी आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी खुंटेफळ साठवण तलाव योजना कार्यान्वित होणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

वर्षानुवर्ष दुष्काळाच्या छायाच असलेल्या आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणकारी असलेल्या खुंटेफळ साठवण तलाव ही योजना आष्टी विधानसभा मतदारसंघाचे फायर ब्रँड नेते सुरेश धस यांच्या संकल्पनेला आणि त्यांच्या स्वप्नातला प्रकल्प असून उद्या मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते प्रकल्पातील बोगद्याचे भूमिपूजन आणि देशभरातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथील मंदिराच्या बांधकामाची भूमिपूजन होणार आहे कोणताही समारंभ यशस्वी करण्याची हातोटी आणि खर्च करण्याची दानत असलेले नेते म्हणून सुरेश धस यांची ख्याती आहे त्यांनी या कार्यक्रमाचे भव्य दिव्य नियोजन केले असून आमदार सुरेश धस आणि त्यांचे शिलेदार या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अहोरात्र झटत आहेत सुमारे एक लाख जनसमुदाय उपस्थित ठेवण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत खुंटेफळ साठवण तलाव खुंटेफळ येथे हा कार्यक्रम होणार असून ६५००० खुर्च्या आणि छत्रपती संभाजी नगर येथील भव्य दिव्य असा शामियाना उभारण्याचे काम सुरू आहे मराठवाड्याच्या हक्काचे ५.६८ टीएमसी पाणी मंजूर असून त्यापैकी एक पॉईंट ६८ पाणी खंडवा साठवण तलावामध्ये येणार आहे परंतु आणखी चार टीएमसी पाणी या ठिकाणी साठवण क्षमता असल्यामुळे त्या दृष्टीने या तलावाचे काम सुरू आहे आमदार सुरेश धस यांनी राजकारणाची सुरुवातच शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीच आपण राजकारणाच्या आखाड्यात उतरलो आहोत याचे वेळोवेळी अत्यंत दाखवून दिले आहे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी ८० हजार मतांच्या प्रचंड



मताधिक्याने विजय प्राप्त केल्यामुळे या नवीन इनिंग मध्ये ते धडाडीने काम करत आहेत देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री मराठवाड्याच्या हक्काचे उरलेले आणखी चार टीएमसी पाणीदेखील मंजूर करतील या आशेने आष्टी आणि परिसरातील शेतकरी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी देखील या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार आहेत आमदार सुरेश धस यांच्या राजकीय कारकीर्दीतील अत्यंत महत्त्वाचा असा हा कार्यक्रम असल्यामुळे त्यांना मानणारा मोठा जनसमुदाय या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासह महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे जलसंपदा मंत्री डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील यांचे सह खासदार बजरंग सोनवणे आमदार प्रकाश सोळंके आमदार संदीप क्षीरसागर आमदार नमिता मुंदडा आमदार विजयसिंह पंडित आणि इतर मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथील कार्यक्रमासाठी नारायण गडाचे महंत हरिभक्त परायण शिवाजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली मंदिराच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम होणार आहे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा विकास झपाट्याने सुरू असून या ठिकाणी देशभरातून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी आणखी सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार सुरेश धस हे प्रयत्नशील असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गहिनीनाथ गडासाठी २५ कोटी रुपये विकास निधी जाहीर केला होता त्याप्रमाणे आष्टी तालुक्यातील या मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासासाठी प्रथमच श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे येत असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडून मोठ्या योजनेची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कंधारमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात साजरा

## तब्बल २५ वर्षांनंतर जुन्या आठवणींना मिळाला उजाळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार येथील श्री गणपतराव मोरे विद्यालयातील सन २०००- २००१ च्या इयत्ता दहावीच्या वर्गातील माजी विद्यार्थ्यांचा शनिवारी, दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर माजी विद्यार्थी एकत्र आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आपल्या जुन्या सवंगड्यांना भेटून अतिशय आनंद वाटला. प्रत्येकाने आपल्या जीवनातील सुख-दुःख, जुन्या आठवणींना व शालेय शिक्षण घेत असताना केलेला अभ्यास, गुरुजींचा खाल्लेला मार तसेच मित्रांसोबतची मौजमस्ती इत्यादी आठवणींना पुन्हा उजाळा दिला.

या स्नेहमेळाव्यात अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक बी. एस. लुंगारे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक आर.एन. गायकवाड, एस. एन. कोनाळे, बी.एम.कंधारे, जी.पी. कौसल्ये, लिपीक एक. ए. केंद्रे, विद्यमान मुख्याध्यापक एस.आर. वागलगावे, डॉ. राहूल धाकडे, ए.बी. लाडेकर, एम.डी. वंजे, निवृत्ती ढवळे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रत्येक माजी विद्यार्थ्याने या दिवसाचा मनसोक्त आनंद घेतला. अनेकांनी आपल्या मनोगतातून शाळेविषयी, शाळेच्या शिक्षकांविषयी आपला आदर व स्नेह व्यक्त केला. बॅचेसच्या वेळेचे विद्यार्थी खूप अभ्यासू, मेहनती, खोडकर, दंगामस्ती करणारे तसेच शिक्षकांचा आदरही राखणारे होते हेच निष्पन्न झाले माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षकांचा सन्मानचिन्ह, पिंपळाचे झाड, शाल, पुष्पहार देऊन सत्कार केला. त्यानंतर शाळेच्या वतीने सर्व माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



मोरे विद्यालयात बऱ्याच वर्षानंतर झालेल्या सत्काराने सर्व शिक्षक आणि विद्यार्थी भावूक झाले होते.यावेळी विकास पवार,डॉ.राजश्री ढवळे, प्रेमिला केंद्रे,नितीन भालेराव, उमेश ढगे,चंद्रमुणी ढवळे आदी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पोर्णिमा पांचाळ हिने केले. सुत्रसंचलन सुरेखा चव्हाण हिने केले.तर आभार विकास पवार यांनी मानले.या मेळाव्यात विकास पवार,डॉ. पोर्णिमा पांचाळ, डॉ. राजश्री ढवळे, प्रविण कांबळे, उमेश ढगे, सचिन बंकवाड, धम्मदिप भालेराव, भालचंद्र अनंतवाड, प्रा. बालाजी पदमवार, चंद्रमुणी ढवळे, प्रा. शिवाजी कवडे, सुरेशा चव्हाण, प्रेमाला केंद्रे, शिवनंदा जवादवाड, मिरा ढवळे, विद्या सोनकांबळे, लवकुश कांबळे, विक्रम ढवळे, आनंदा कांबळे, शिवाजी झंपलवाड, तानाजी वाघमारे, लवकुश शिंदे, अंकुश शिंदे, नितीन भालेराव, गोविंद कोंडे, भुजंग चावरे, विलास शंकपाळे आदी माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी सहशिक्षक एन.बी.शेख, पी. जी. सोळंके, पी. एन. गव्हाणे, सौ.एस. वाय. वाघमारे, एस.एन. चव्हाण, एन. बी. लुंगारे, सौ.एस.व्ही. ठाकुर, आर.एस. कमजाळगे, पी.बी. अनकाडे, लिपीक डी. बी. उगले, सेवक बी. व्ही. उगले, सेवक बी.आर. सोनकांबळे, एस.एस. पंदेवाड आदी उपस्थित होते.

# वाघोली डॉक्टर्स आयोजित प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

वाघोली डॉक्टर्स असोसिएशन च्या माध्यमातुन विविध उपक्रम राबविले जातात.असोसिएशनच्या वतीने संस्थापक डॉ विनोद सातव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सनग्लो ग्राउंड सणसवाडी येथे वाघोली डॉक्टर्स प्रीमियर लीग अर्थात डब्ल्यू डी पी एल या क्रिकेट स्पर्धांचे भव्य आयोजन पुणे शहर व जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील डॉक्टरांच्या संघटनांसाठी केले होते.

स्पर्धेचे आयोजक व नियोजक डॉ विनोद सातव, डॉ मच्छिंद्र काशीद, डॉ ज्ञानेश्वर खरात, डॉ भूषण विधाते, डॉ श्रीनिवास मैंदाड, डॉ रवी धायगुडे, डॉ नितीन पवार, डॉ संतोष खरात, डॉ अभिजित लांडगे यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

२७ जानेवारी ते १ फेब्रुवारी या सहा दिवस चाललेल्या क्रिकेट स्पर्धेत काटेकोर नियम व शिस्तबद्धता पाहायला मिळाली. या स्पर्धेला पहिल्या दिवसापासून शेवटपर्यंत अनेक मान्यवर डॉक्टरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. स्पर्धेतील चार क्रमांक पटकविलेले संघ व इतर बक्षिसे मिळवणारे सर्वोत्कृष्ट खेळाडू :– १) प्रथम क्रमांक विजेता हडपसर वारियर्स

२) द्वितीय क्रमांक उपविजेता पी डी सी सी पुरंदर

३) तृतीय क्रमांक के आर डी डी ए कारेगाव

४) चतुर्थ क्रमांक दौंड वारियर्स

मॅन ऑफ द मॅच – डॉ अविनाश गावडे




फायटर ऑफ द मॅच – डॉ विवेक कणीचे

मॅन ऑफ द सिरीज – डॉ अविनाश गावडे

बेस्ट बॅट्समन ऑफ द टूर्नामेंट – डॉ अविनाश गावडे, बेस्ट फिल्डर ऑफ द टूर्नामेंट – डॉ श्रीकांत साखरे ,कॅच ऑफ द टूर्नामेंट – डॉ चेतन काकडे, बेस्ट बॉलर ऑफ द टूर्नामेंट – डॉ प्रवीण मोरे, क्रिकेट स्पर्धांसाठी स्पॉन्सर म्हणून मणिपाल हॉस्पिटल्स, आय एम एच एस हॉस्पिटल, लाईफलाईन हॉस्पिटल, एम ओ सी कॅन्सर सेंटर, मेट्रो हॉस्पिटल, केअर हॉस्पिटल, याशिका हार्ट केअर, मेडिकेअर डायग्नोस्टिक सेंटर, व्होल्टा डायग्नोस्टिक, ओम हार्ट केअर या सर्व डॉक्टरांनी मदत केली. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभ व शेवटच्या दिवशी बक्षीस वितरण समारंभ उत्साहात थाटामाटात पार पडला. बक्षीस वितरण समारंभप्रसंगी मणिपाल हॉस्पिटलचे श्री परमेश्वर दास, डॉ रघुनाथ रामकर, डॉ शंकर वावरे, डॉ ज्ञानोबा भास्कर, डॉ विजयकुमार गुट्टे, डॉ स्मिता कोलते, डॉ अनिता सातव, डॉ मयुरा बेहेळे, डॉ ज्योती जाधव, डॉ विजया जायभाई, डॉ नीलिमा तेली, डॉ रश्मी खरात, श्री सनी मकासरे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत डॉक्टरांचे एकूण १६ संघ सहभागी झाले होते. क्रिकेट प्रेमींसाठी हि एक आनंदाची पर्वणी होती, त्यांनी डॉक्टर्स असोसिएशन चे मनःपूर्वक आभार मानले.




**मनाचा द्रढ निश्चय असल्यास माणूस काय करू शकतो याचा प्रत्यय योग शिबिरात पाहण्यास मिळला.व्हीपीके पतसंस्था नांदेड आयोजित केलेल्या ७ दिवसीय योग शिबिरातील पहिला दिवशी राजू संभाजी शेटे वय ५४ वर्ष असलेला एक नवतरुण बांधव एका पायाने अपंग असताना मनाशी जिद्ध बाळगून,अवयावर मात करत मनाच कुठलच दुःख व्यक्त नं करता योग शिबिरात आसन केले असता संस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी अभिनंदन व्यक्त करत सन्मान केला.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**




**डॉक्टर्स असोसिएशन आयोजित डॉक्टर्स प्रिमियर लीग अर्थात डब्लू डी पी एल या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन सनग्लो ग्राउंड सणसवाडी येथे करण्यात आले होते या प्रसंगी निर्भीड , नि:पक्षपाती पत्रकार श्री स्वरूप गिरमकर यांनी भेट देत डॉक्टर खेळाडूंना शुभेच्छा दिल्या याप्रसंगी त्यांचा कृतज्ञता सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.(छाया:– लोकनेता न्यूज नेटवर्क हवेली वाघोली )**

# उद्धव मामडे यांना साने गुरूजी राष्ट्र प्रेरणा २०२५ चा आदर्श पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार मुंबई येथे प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

तालुक्यातील निर्भीड पत्रकार उद्धव मोहनराव मामडे रावधानोरकर यांना साने गुरूजी राष्ट्र प्रेरणा महाराष्ट्रच्या वतीने २०२५ चा आदर्श पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार गोल्ड मेडल, स्मृतिचिन्हे,सन्मानपत्र हा दिग्गज मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.आयोजक सुरज भोईर सुप्रसिद्ध पत्रकार सामाजिक कार्यकर्ते यांच्या संकल्पनेतून साने गुरूजी राष्ट्र प्रेरणा महाराष्ट्रचा भव्य दिव्य पुरस्कार सोहळा दि.०२ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध समाजसेवक, समाजसेविका,सिने अभिनेत्री,लेखक,गायक,गायिका, शिक्षक,पत्रकार अश्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुरस्कारार्थींना मान्यवरांच्या हस्ते दि.०२– फेब्रुवारी रोजी महर्षी दयानंद महाविद्यालय( च.ऊउजडडएऋ )– उ/हॉल सभागृह के.ई.एम.हॉस्पिटलच्या पाठीमागे डॉ.शिरोडकर मार्ग परळ मुंबई,येथे सन्मानित करण्यात आला.साने गुरूजी राष्ट्र प्रेरणा महाराष्ट्र संस्था हि अनेक गोरगरीब गरजूंना मदत सतत,करत असतात कोरोनाच्या महामारीत अन्न धान्य,किराणा सामान,कपडे,औषध उपचार करण्यात मदत केली,मुंबई परिसरातील अडीअडचणीत पाणी



टंचाई, दुष्काळग्रस्ताना मदत अश्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम हि साने गुरूजी राष्ट्र प्रेरणा महाराष्ट्र संस्था कामे केली व सतत करत असतात. या पुरस्कार कार्यक्रमास कार्यक्रमाचे उदघाटक मुंबई विद्यापीठ कुलगुरू मा.खासदार श्री.भालचंद्र मुणगेकर सर,स्वागताध्यक्ष श्री अजय चौधरी उ.बा.ठा.चे आमदार तथा मा. गटनेते विधिमंडळ, मा.मंगला परब संस्थापक अध्यक्ष विद्या विहार पालघर,मा.स्वाती ओक समाजसेविका सौंदर्य तज्ञ,मा.डॉ.कॅरोन टेरी रजा सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री इंजिनिअर अभिजीत गादगे बिलोलीकर मा.चारूशिला देशमुख अध्यक्षा शिवाजीराव देशमुख शि.सं.मुंबई, मा.दिलीप नारद समाजभूषण पोलीस मित्र,मराठी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री मा.सुषमा सिनलकर, मा.जयश्री गायकवाड प्रसिध्द सिने अभिनेत्री मा.संगीता गुरव उद्योजक व समाजसेविका मा.दीप्ती उर्फ प्रेरणा गावकर कुलकर्णी,अध्यक्षा प्रेरणा फाऊंडेशन, मा.देवानंद कांबळे समाजभूषण राष्ट्रीय महासचिव, श्री.प्रसाद भागवत पावनखिंड फेम अभिनेता दिग्दर्शक संयोजक सुरज भोईर पत्रकार सामाजिक कार्यकर्ते, गायक, मा.दतराम म्हात्रे सुप्रसिद्ध लोकशाहीर,निमंत्रित मा.सुभाषराव गायकवाड आरोग्य मित्र,मा.विजय केदासे मा.विजय भोसले,मा.एन. ए.कदम,सा.कार्यकर्ते पत्रकार मा.डॉ.विजय मोरे समाजभूषण पु.सा.महाराष्ट्र यांच्यासह दिग्गज कलाकार दिग्दर्शक उद्योजक राजकीय अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत होते.उद्धव मामडे यांना पत्रकारीता क्षेत्रामधील उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना जाहीर झाला असून त्यांना यापूर्वीही राज्यस्तरीय पत्रकारीता सामाजिक,विविध क्षेत्रातील ४७ पुरस्कार मिळालेले आहेत. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदर्श व्यक्तीला विविध पुरस्काराने,विविध व्यक्तींना राज्यस्तरीय हा पुरस्कार दिला जातो. यामध्ये राज्यस्तरीय पत्रकारिता, शैक्षणिक, सामाजिक,राजकीय, पत्रकार उद्धव मोहनराव मामडे रावधानोरकर यांना हा 'मान नेतृत्वाचा सन्मान कर्तृत्वाचा' हा आदर्श पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार गोल्ड मेडल स्मृतिचिन्ह सन्मानपत्र दिल्याबद्दल जिल्हातील शिक्षक वृंद, राजकीय पक्ष पत्रकार बांधव माझ्या कुटुंबासह मित्र परिवार सर्व स्थरातून त्यांच्या कौतुकाचा वर्षाव होत आहे.सुत्रसंचलन आयोजक सुरज भोईर यांनी केला आहे व आलेल्या मान्यवरांच आभार मानले आहेत.

# संपर्क कार्यालयात घुसून लाठी चार्ज करणे व पोलीस कोठडीत मारहाण करणे लोहा पो.नि.आयलाने यांना भोवले

## जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार लोहा न्यायालयात पो.नि.आयलाने यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

नोव्हेंबर महिन्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणूक निकालाच्या दिवशी सेवाजन शक्ती पार्टीच्या व राष्ट्रवादी कॉंग्रेस महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये निकाल क्षेत्राच्या बाहेर किरकोळ बाचाबाची झाली होती या प्रकरणाचा धागा धरून लोहा ठाण्याचे पो.नि. नागनाथ आयलाने यांनी वरिष्ठांची रीतसर लेखी परवानगी न घेता छ. शिवाजी महाराज चौकातील कंधार रोड परिसरात असलेल्या सेवा जन शक्ती चे उमेदवार प्रा धोंडे यांच्या संपर्क कार्यालयात घुसून कार्यकर्त्यांवर अमानुष लाठीचार्ज करून कार्यकर्त्यांना गंभीरपणे जखमी केले व त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना लोहा ठाण्यात अटक केली कार्यक्रत्ये पोलीस कोठडीत असताना त्या ठिकाणी ही कार्यकर्त्यांना आमनुष्यपणे मारहाण केली असल्याचा जबाब चार कार्यकर्त्यांनी लोहा न्यायालयात न्यायधीशा समोर दिला लोहा न्यायालयाने या प्रकरणी जिल्हा न्यायालयाकडे मार्गदर्शन तत्वे मागविले होते यावरून जिल्हा सत्र न्यायालयाने चार कार्यक्रत्ये आरोपीने एकाच गुन्ह्यात वेगवेगळी जबाब नोंदविली असल्याने प्रकरण एकच असून जबाब चार आहेत ही सर्व जबाब तक्रार संयुक्तिक पणे असल्याने विना परवानगी कायद्याचा व पदाचा वापर करून कार्यालयात घुसून लाठीचार्ज करून जखमी करणे व पोलीस कोठडीत बेदम मारहाण करून जखमी करणे ही बाब गुन्हा ठरणारी असल्याने लोहा ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्यावर जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार लोहा न्यायालयात विविध कलाम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे यामुळे लोहा ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांना सेवा जण शक्ती पार्टीचे तथा शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रमनोहर धोंडे यांनी चांगलाच कायद्याचा बगडा दाखविला आहे या प्रकरणाची याचिका ही सेवा जण शक्ती पार्टीच्या कार्यकर्त्यांनी मुंबई हायकोर्टात दाखल केली असून त्या याचिकेचा निकाल लागणे अपेक्षित आहे

या प्रकरणाची माहिती अशी आहे की विधानसभा निवडणुकीत सेवा जण शक्ती पार्टी कडून प्रा मनोहर धोंडे राष्ट्रवादी कॉंग्रेस महायुतीचे प्रतापराव पाटील चिखलीकर महाविकास आघाडी शिवसेना ठाकरे गट एकनाथ दादा पवार यांच्यात लढत झाली निवडणूक निकालाच्या दिवशी तहसील कार्यालय समोर प्रतापराव पाटील चिखलीकर व प्रा मनोहर धोंडे यांच्या कार्यकर्त्यांत किरकोळ बाचाबाची झाली या प्रकरणाचा मुद्दा धरून लोहा ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनीइ जाणीवपूर्वक वरिष्ठांचा आदेश न घेता प्रा मनोहर धोंडे यांच्या सेवा जन शक्ती पार्टी जण संपर्क कार्यालयात घुसून बेदम लाठीचार्ज केला यात प्रा मनोहर धोंडे यांचे बंधू महादू बाबाराव धोंडे वय ५४ र शेवडी विजय दिगंबर चपटे वय ३५ र शेवडी

माधव मारोती भुरे वय २८ शिराढोन करणं साधू वडजे वय १९ वर्ष र हळदव यांना बेदम मारहाण करून जखमी केले व उलट त्यांना अटक करून ठाण्यात नेऊन गुन्हा दाखल केला आहे पोलीस कोठडीत पुन्हा या चार ही आरोपीना मारहाण करून जखमी केले न्यायालयात हजर केले असता या वरील चार ही जणांनी न्यायालयात न्यायधीशा समोर मारहाण करून जखमी केल्याचा लेखी व तोंडी जबाब दिला आहे पीठासीन अधिकारी यांनी जबाब नोंदवून घेऊन न्यायधीशा च्या आदेशानुसार वरील चार ही जणांना उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले व या प्रकरणाचे मार्गदर्शन तत्व घेण्यासाठी लोहा न्यायालयाने जिल्हा सत्र न्यायालयात पाठविले असता संपूर्ण चौकशी करून जिल्हा सत्र न्यायालयाने हे प्रकरण एक असून दिलेला जबाब सयुक्तिक पणे आहे नियमांचे भंग करणे कायदा हातात घेणे पदाचा दुरुपयोग करणे वरिष्ठांची परवानगी न घेणे यावरून जिल्हा सत्र न्यायालयाने पोलीस निरीक्षक आयलाने यांच्या विरुद्ध लोहा न्याल्याकडे गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला असल्याने लोहा कोर्टात गुन्हा र क्र ३९४ कलम १३२, १८९ ,(१)१८९( २ ,)१८९(,३) १८९ (४ )१८९ (५ )१२१ (१) ४९ ५४ ,,भा न्या संहिता २०२३ कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे

या प्रकरणाची तक्रार करणं साधू वडजे यांनी मुबंई हायकोर्टात दाखल केली आहे या तक्रारीचा निकाल येणे बाकी आहे

पोलीस निरीक्षक यांच्या वरच न्यायालयाने गुन्हा दाखल केला असल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे .पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या कार्यकाळात लोहा ठाण्याच्या हद्दीत मटका गुटका अवैद्य वाळू वाहतूक देशी विदेशी दारू विक्री जुगार चंदन तस्करी गांजा तस्करी अवैध वृक्ष तोड आदी अवैद्य धंद्याला उत आला आहे मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू आहेत पोलीस मात्र डोळेझाक करून मलिदा लाटत आहे अशी भावना जनसामान्यांची झाली आहे.

# मरखेल पोलीसांनी सतरा हजार रुपयांची दारू जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मौजे लोणी येथे देशी–विदेशी दारू सह गावठी दारू विक्रेत्यावर पोलिसांनी धाड टाकून १७ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.देगलूर तालुक्यातील मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्याचा सुळसुळाट झाला असून या अवैध धंद्यावर अवर घालण्यासाठी मौजे लोणी बस स्थानक देगलूर औराद रोड लगत असलेल्या टिन पत्राच्या शेडमध्ये अवैधरित्या देशी, विदेशी दारू सह गावठी हातभट्टीची दारू बिनधास्त राजरोसपणे खुलेआम विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे .

पोलीसांनी आरोपी लिंगूराम यादव गुडलिंगू तसेच धोंडूबाई मष्णाजी किशवे रा. लोणी या दोघांच्या शेडची तपासणी केली असता त्याठिकाणी असलेल्या धोंडूबाई मष्णाजी किशवे यांच्या कडून विनापरवाना बेकायदेशीर बाळगलेल्या देशी, विदेशी दारू पकडण्यात आले. देशी भिंगरी संत्रा नावाची १८० मिली क्षमतेच्या १९२ काचेच्या सिलबंद बाटल्या तसेच विदेशी मॅगडल १६ बाटल्या अशी त्याची एकुण किंमत १३४४० रूपयांचे मुद्देमाल चोरट्या मार्गाने विकण्यासाठी बाळगल्याचे आढळून आले तसेच लिंगूराम यादव गुडलिंगू यांच्या शेडमध्ये १७ देशी दारू सिलबंद बाटल विदेशी दारू मॅगडल नंबर वन च्या १९ बाटल यांची एकूण किंमत ४२३० रूपयांचे मुद्देमाल जप्त करण्यात आला पोलीस जमादार



चंद्रकांत गीरी यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरूद्ध गुन्हा नं. २४/२० भादवि कलम ६५ ई प्रमाणे नोंद करण्यात आला पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक रवी हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार चंद्रकांत गीरी, हवालदार रवींद्र घुले व इतर कर्मचाऱ्यांनी कामगिरी बजावली आहे. या घटनेमुळे परिसरात अवैध रित्या दारू विक्री करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येक गाव, वाडी, तांड्या वस्त्यांमध्ये असलेल्या धाबा, खानावळ, हॉटेल्स, किराणा दुकानातून अवैध रित्या देशी, विदेशी दारू सह हातभट्टीची दारू बिनधास्त राजरोसपणे खुलेआम विक्री होत आहे त्याच बरोबर मटका, गुटखा, जुगार अड्डा, सट्टा खेळत असलेल्या व्यक्तीवर पोलीसांनी अशीच धडक मोहीम राबविल्यास परिसरातील संपूर्ण अवैध धंदे बंद होतील अवैधरित्या धंद्यामुळे वेशनी अहारी गेलेल्या व उध्वस्त झालेल्या लोकांचे संसार मार्गी लागतील अशी अपेक्षा महिला व बाल वर्गाकडून केली जात आहे.


# नर्सिंग कॉलेजचे संचालक शंकर बाबरे यांनी विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस कोठडी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर | जयपाल दावनगीरकर**

देगलूर येथील एका बोगस नर्सिंग कॉलेज मधील विद्यार्थ्यांना जि एन एम ची पदवी प्राप्त करून देतो म्हणून संस्थेचे संचालक शंकर बाबरे यांनी विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस व प्रशासनाकडे तक्रार करून न्याय मिळाला नाही अखेर मिडिया व विविध वृत्तपत्रांतून विध्यार्थ्यांची बाजू मांडल्याने पोलीस प्रशासनाने खडबडून जागा होऊन संस्था संचालक शंकर बाबरे यांच्यावर १५ दिवसांनंतर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समृद्धी शिक्षण व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित, समृद्धी कॉलेज ऑफ नर्सिंग अँड पॅरामेडिकल सायन्स या नावाने चालणाऱ्या कॉलेजमध्ये देगलूर शहर व ग्रामीण भागातील तसेच इतर राज्यातून आलेल्या इ.सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना नर्सिंग डिप्लोमा पूर्ण करण्याचे स्वप्न पाहून ४०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. नर्सिंग प्रवेश मिळविण्यासाठी यात काही गरीब कुटुंबातील पालकांनी विद्यार्थ्यांच्या पुढील भविष्य उज्वल करण्यासाठी मोल मजूरी व पोटाला पिळ मारून उपजीविका भागवित आर्थिक बाजू बळकट नसलेल्या पालकांनी व्याजी शेकडा १०% रुपये प्रमाणे रक्कमा काढून नर्सिंग कोर्ससाठी विद्यार्थी पालकांकडून प्रत्येकी ४० ते ५० हजार रुपये फी म्हणून संचालक शंकर बाबरे यांना देण्यात आले.



शुल्क आकारणीच्या वेळेस विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश घेताना ०३ वर्षात डिप्लोमा कोर्स पूर्ण होणार असे सांगण्यात आले होते पण ५ वर्ष उलटून ही अद्याप एक सादी सराव परीक्षा कॉलेजने सुद्धा घेतलेली नाही. एका वर्षापूर्वी परिक्षेसाठी कर्नाटक राज्यातील बेंगलोर, बिदर, हुमनाबाद अशा ठिकाणी नेले होते काही कारणास्तव परिक्षा रद्द झाल्याचे सांगून त्यांना परत पाठवण्यात आले. वर्षभरापासून विद्यार्थ्यांनी परिक्षा केव्हा होणार अशी विचारणा करण्यासाठी विध्यार्थी कॉलेज ला चकरा मारून पायातील चप्पल झिजविला असताना कॉलेजचे संचालक शंकर बाबरे यांनी विद्यार्थ्यांना खोटे नाटे कारणे दाखवून उडवा उडवीच्या उत्तरे देऊन दिशाभूल करून फसवणूक करीत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे परत दिल्या जात नसल्याने विद्यार्थ्यांनी १५ दिवसाच्या पुर्वी देगलूर च्या पोलीस उपअधीक्षक व उपजिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी निवेदन देण्यात आले पण गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.विद्यार्थ्यांच्या जिवनाशी छेळ करून पाहणाऱ्या संस्था संचालक शंकर बाबरे यांनी ४०० विद्यार्थ्यांकडून अर्थीक माया उकळून जवळपास चार - पाच कोटींचा आकडा पार करून विद्यार्थ्यांची फसवणूक केली आहे. तसेच समृद्धी नर्सिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्र संपूर्ण फी परत करून कॉलेजचा परवाना रद्द करण्यात यावा व संचालक शंकर बाबरे यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी पालकांकडून जोर धरून पोलीस प्रशासनास सळो की पळो केल्याने अखेर संचालक शंकर बाबरे यांच्या मुसक्या आवळल्या ०१ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा अटक करून देगलूर कोर्टात हजर करण्यात आले त्यांना कोर्टाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# अंगणवाडी केंद्रात भरला हाळदी कुंकवाचा कार्यक्रम



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर | माधव नागलवाड**

रिठा येथील अंगणवाडी केंद्रात हळदीकुंकवाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हटल तर अंगणवाडी केंद्रातील बालकाच्या माता,भगनी बोलावून त्यांना आपल्या बालकांच्या आरोग्य ,स्वच्छता, आहाराविषयी ,कुपोषण, पोषणमूल्य ईत्यादी विशयी माहीती देऊन तत्पूर्वी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करुन हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाला जि.प.प्रा.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती.कमटलवार,श्रीमती पाध्ये ,श्रीमती पोपलवार,श्रीमती.शेटलवार,श्रीमती सोनटक्के, श्रीमती.सावते तसेच गावातील अंसंख्य महिला उपस्थित होत्या. ह्या कार्यक्रमाची महिलांना वान देवून सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका सविता नागलवाड,कल्पना भाटे,रेखा गायकवाड,संतोषी करंदीकर व अंगणवाडी मदतनीस चंद्रकला बाचेवाड,सावित्रा कुंभरवाड,आरती करंदीकर,काजेल गायकवाड ईत्यादिने परीश्रम घेतले.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रंगोत्सव तरुणाईचा हा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

रयत शिक्षण संस्थेचे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात रंगोत्सव तरुणाईचा जल्लोष एम.जे.एस.चा हा विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी शुभेच्छा दिल्या. शिस्तीचे पालन करून विविध गुणदर्शन या कार्यक्रमाचा आनंद घ्या.

विद्यार्थ्यांच्या कलेला दाद द्या. असे ते म्हणाले. या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात भक्ती गीते, लोकगीते, चित्रपट गीते, प्रेरणादायी गीते इत्यादींचे गीत गायन उत्तम पद्धतीने विद्यार्थ्यांनी केले. शास्त्रीय नृत्य, कथक, लोकनृत्य, लावणी, बांगडा, समकालीन नृत्य, रिमिक्स गाण्यावरील डान्सला उदंड असा प्रतिसाद मिळाला. भरतनाट्यम, मावळा गीत या गीतांनाही विद्यार्थ्यांनी दाद दिली. फिशपोंड्सचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. त्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, ज्युनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. शहाजी मखरे, सौ.लता जरे , सांस्कृतिक विभागाचे डॉ. राजाराम कानडे, कार्याध्यक्ष डॉ. बापू देवकर, प्रा. सौ. सुनिता सोनावळे, श्री रघुनाथ लबडे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, शा. शि. संचालक प्रा. कल्पना बागुल, प्रा. संजय डफळ, अधीक्षक बाळासाहेब राऊत, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी या उपक्रमासाठी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. दिलावर पठाण, प्रा. प्रियांका म्हस्के यांनी केले. आभार प्रा. सौ सुनीता सोनावळे यांनी मानले.

# गावखेड्यातही उत्कृष्ट शिक्षण मिळु शकते उद्योजक दत्तात्रय काकडे

## वाघोरा येथिल गोल्डन इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात बोलतांना!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून बहुतांश पालक आपल्या पाल्यांना वसतीगृहात किंवा बस मधून शिक्षण घेण्यासाठी शहरी भागात पाठवतात मात्र गाव खेड्यातील शाळांमधील शिक्षक वृंद योग्य असल्यास मुलांचा शैक्षणिक विकास होऊ शकतो असे प्रतिपादन उद्योजक दत्तात्रय काकडे यांनी वाघोरा येथिल गोल्डन इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात बोलतांना केले. तालुक्यातील वाघोरा येथे गोल्डन इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन २ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उद्योजक दत्तात्रय काकडे व ठाणेदार ब्रम्हदेव शेळके हे होते तर अध्यक्षस्थानी अश्विनीताई शेरे या होत्या यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना काकडे म्हणाले जीवनात यशस्वी होण्यासाठी कधीही स्वतःला कमी समजू नका, कोणतीही गोष्ट अशक्य करता येते त्यासाठी जिद्द व चिकाटीने प्रयत्न केले पाहिजे.



छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी संघर्ष कायम सुरू ठेवाला शाळेच्या बाहेर बसून सुद्धा डॉ बाबासाहेब घटनेचे शिल्पकार झाले एवढेच नव्हे तर देशात महत्त्वाच्या पदांवरील जिल्हाधिकारी, आयपीएस अधिकारी गरीबीचा संघर्षातुन जिद्दीने आज त्या पदावर कार्यरत आहेत. मी सुद्धा वयाच्या बाराव्या वर्षी गावात सालगडी म्हणून काम करत होतो आज माझ्याकडे दिडशे मल्टी एक्सेल गाड्या, पेट्रोल पंप रेस्टॉरंट सह आदी संपत्ती आहे. असेही ते म्हणाले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर गीतं, नाटकं, व्यसन मुक्ती पर चांगले संदेश उपस्थितांना दिले. यावेळी शिक्षक वृंद, गावकरी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रांजणगाव येथे हीलिंग लाइव्हस कुटुंब मेळावा २०२५ उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर | प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील मंदिर परिसरातील सभागृहात हीलिंग लाइव्हस या सामाजिक संस्थेचा एच एल कुटुंब मेळावा २०२५ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात संस्थेच्या जागतिक स्तरावर सकारात्मक उर्जास्त्रोत असलेल्या कुटुंबाची एकत्रित बैठक घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्र हेड संतोष सांबारे, देवस्थान ट्रस्ट सचिव डॉ. तुषार पाचुंदकर पाटील, शिरूर तालुका ग्रंथालय संघ अध्यक्ष तथा द युवा ग्रामीण पत्रकार संघ राज्य सहसचिव विवेकानंद फंड, विजय पाचंगे, डॉ. भारती पडवळ, सीमा संकपाळ, नितीन अवचर, सचिन ठाणगे, प्रणित दसगुडे, हरीश अवचर, उज्वला इचके यांनी संस्थेविषयी आपली मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमास सुनिल पडवळ, संतोष झंजाड,



डॉ. प्रणव हेशी, गौतम कर्डिले, राहुल पवार, शुभम मलगुंडे, प्रमोद नरवडे, रोहन मलगुंडे यांची उपस्थिती होती. संस्थेत नव्याने सहभागी झालेल्या स्वयंसेवकांना गुलाबपुष्प व टी-शर्ट देऊन सन्मानपूर्वक कुटुंबात सामील करून घेण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन स्वप्निल फलके, बाबासाहेब झावरे, पृथ्वीराज सांबारे, ओंकार सरोदेयांनी केले. तर डॉ. निकिता तळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हीलिंग लाइव्हस संस्थेच्या एचएल कुटुंब मेळावा २०२५ च्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# छत्रपती संभाजीनगरची खाजगी बस गोव्याहून परतताना उलटली

## उस्माननगरचा युवक ठार ;चार दिवसांत दुसरी घटना,परिसरात शोकाकुल वातावरण


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर | प्रतिनिधी**

जांब ते शिरूरताजबंद रोडवर शुक्रवार ३० जानेवारी रोजी ची घटना ताजी असताना काल दि .२ फेब्रुवार रोजी मध्यरात्री गोव्यावरुन छ. संभाजीनगरकडे परत येताना करवीर तालुक्यातील कांडगाव येथे खाजगी बस उलटून झालेल्या अपघातात उस्माननगर ता.कंधार येथील अमोल परशुराम भिसे ( ४० ) वर्षीय युवकांचा मृत्यू झाल्याची बातमी समजताच परिसरात शोकाकुल वातावरण झाले.

मिळालेल्या वृत्तानुसार गोव्यावरून छत्रपती संभाजीनगरकडे परतणारी खासगी बस करवीर तालुक्यातील कांडगाव येथे रविवारी मध्यरात्री उलटून झालेल्या अपघातात एक जण ठार झाला. अमोल परशुराम भिसे (वय ४०, रा. छत्रपती संभाजीनगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या अपघातात ३० पेक्षा जास्त जण जखमी आहेत. यातील चार जणांची प्रकृती चिंताजनक आहे. प्रत्यक्षदर्शी आशिष पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी कंपनीतील सुमारे १४३ कर्मचारी ३० जानेवारीला चार खासगी बसमधून सहलीसाठी गोव्याला गेले होते. रविवारी सायंकाळी साडेसात वाजता ते गोव्यावरून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने परत निघाले. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास त्यांनी कणकवलीमध्ये जेवण केले. तेथून फोंडा घाट मार्गे कोल्हापूरकडे ते निघाले. तेथून छत्रपती





**उस्माननगर येथील तीन चार दिवसांत जवान दोन यूवक अपघातात मृत्यू झाल्याने परिसरात शोकाकुल वातावरण व हळहळ व्यक्त होत आहे.**

संभाजीनगरकडे ते निघाले होते.यातील एक बस (डी. डी. ०१/ टी. ९३३३) रात्री १२ वाजण्याच्या सुमारास कांडगाव येथे वळण घेताना उलटली. या बसमध्ये ३५ प्रवासी होते. यात तीन महिलांचा समावेश होता. सर्व प्रवासी २५ ते ४० या वयोगटातील होते. बस उलटून अपघात झाल्याचे समजताच तेथील ग्रामस्थ तातडीने घटनास्थळी जमले. यावेळी एकजण जागीच ठार झाल्याचे निदर्शनास आले. उस्माननगर येथील भूमिपुत्र अमोल परशुराम भिसे हा लहानपणा पासून हुशार होता. त्याचे बारावी पर्येतचे शिक्षण गावतच झाले. आयटीआय करून (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर येथील ए. एस. आर. कंपनीत मेकॅनिकल इंजिनिअर या पदावर कार्यरत होता. त्यांच्या पश्चात आई, बाबा , दोन भाऊ, पत्नी ,मुलगा, असा परिवार आहे . उस्माननगर येथील स्मशानभूमीत सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904